# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (समाज कल्याण विभाग)

## दिनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत कंत्राटी तत्वावरील रिक्त पदे भरणेबाबतची जाहीर सूचना

शासन निर्णय नगर विकास क्रमांक एनयुएलएम–2017/प्र.क्र.144/नवि. 20 दिनांक 31 ऑक्टोबर 2017 नुसार दिलेल्या निर्देषान्वये केंद्र शासन पुरस्कृत दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-National Urban Livelihoods Mission) अंतर्गत महानगरपालिकेत समुदाय संघटकांची ठोक मानधनावरील कंत्राटी तत्वावरील रिक्त पदे भरणेबाबत इच्छुक व पात्र उमेदवारांकडून सदर जाहिरातीद्वारे दिनांक 11.06.2018 पावेतो अर्ज मागविण्यात येत आहे.

## अर्ज स्विकारण्याचे (स्थळ आणि वेळ)

दिनदयाळ अंत्योदय योजना–राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, समाज कल्याण विभाग, नागपूर महानगरपालिका कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर.

**वेळ :–** सकाळी 11.00 ते 5.30 वाजेपर्यंत राहिल (शासकिय सुट्टीचे दिवस वगळून) विहित वेळेनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही

| अ. क्र. | पदाचे नांव | संख्या | एकत्रित मासिक मानधन (रूपये) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वय | प्रर्वगानुसार आरक्षण | | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | समुदाय संघटक | 08 | 15,000/– | किमान 12 वी पास समाज विकास क्षेत्रामध्ये 5 वर्षाचा अनुभव आवष्यक, विषेषतः दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. संगणकामध्ये (MS-CIT) (Word, Excel, Powerpoint) यांचे ज्ञान आवष्यक | 18 ते 45 /सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेत अंतर्गत काम केलेल्या उमेदवारसाठी 5 वर्ष षिथिल | 1) अनुसूचित जाती–<br>2) अनुसूचीत जमाती –<br>3) वि.जा.अ. –<br>4) भ.ज.ब. –<br>5) भ.ज.क. –<br>6) भ.ज.ड. –<br>7) वि.मा.प्र. –<br>8) इ.मा.व. –<br>9) खुला –<br>एकुण – | 00<br>02<br>01<br>01<br>01<br>00<br>01<br>00<br>02<br>08 | |

## 1. अर्ज सादर करण्याबाबतच्या सूचना :–

1.1 उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमुद पदाकरिता विहीत केलेला अर्जाचा नमुना www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. अर्जात आवष्यक सर्व रकान्यात अचुक माहिती भरून विहित ठिकाणी स्वतःचा अलीकडच्या काळातील फोटो लावून तो स्वः साक्षांकित करावा तसेच शैक्षणिक अर्हता व इतर सर्व प्रमाणपत्रे साक्षंकित करून अर्जासोबत सादर करावे

1.2 वरील पदाकरीता अर्ज करण्याची शेवटची तारीख 11.06.2018 ही असून आवष्यक सर्व कागदपत्रासह परिपुर्ण अर्ज दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, समाज कल्याण विभाग या नावाने कार्यालयीन वेळेत (षासकीय सुट्टीचे दिवस वगळून) समक्ष स्वीकारले जातील.

1.3 उमेदवारांनी इतर शैक्षणीक अर्हता यामध्ये त्यांचे कडे असलेल्या इतर शैक्षणीक अर्हतेचा उल्लेख करावा.

1.4 विहीत दिनांकानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. अपुर्ण भरलेले, त्रुटी असलेले अर्ज ग्राहय धरल्या जाणार नाही व सदर अर्ज नाकारल्या गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

1.5 अर्जासोबत शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती, उमेदवार दारिद्रय रेषेखालील असल्यास सक्षम अधिकाऱ्याने दिलेला प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या, संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास, संस्था महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार नोंदणीकृत असावी. शासकीय कार्यालयीन कामाचा अुनभव असल्यास, षासकीय अधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र, संगणक पात्रता पुर्ण करीत असल्याचे प्रमाणपत्र, व इतर सर्व आवष्यक प्रमाणपत्रांच्या स्वः साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्या, त्याचप्रमाणे स्वतःचा पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता लिहीलेला व रू. 5/– चे डाक तिकीट लावलेले 9 x 4 इंच आकाराचे 2 लिफाफे जोडावेत.

## 2. भरती प्रक्रियेचा कार्यक्रम :–

| अ.क्र. | भरती प्रक्रिया कार्यक्रम | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | जाहीरात प्रसिध्दीचा दिनांक | 30.05.2018 |
| 2 | आवेदनपत्र स्विकारण्याचा अंतिम दिनांक | (सुट्टीचे दिवस वगळून) |

## 3. पदाच्या निवडीबाबत कार्यपध्दती :–

3.1 विहित कालावधीत प्राप्त सर्व अर्जांची छाननी करून लेखी परिक्षा/मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर व समाज कल्याण विभाग मनपा, नागपूर चे सुचना फलकावर प्रसिध्द करण्यात येईल.

3.2 पात्र उमेदवारांच्या अंतिम यादीनुसार पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन लेखी परिक्षा व प्रत्यक्ष मुलाखत घ्यावी किंवा केवळ मुलाखत घेऊन उमेदवाराची अंतिम निवड करावी याबाबतचा निणर्य निवड समितीव्दारे घेण्यात येईल.

3.3 लेखी परिक्षा व मुलाखती दोन्ही घेण्यात आल्यास वरील पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या गुणसंख्या किमान किती असावी याबाबतचा निर्णय निवड समितीद्वारे घेण्यात येईल.

## 4 समुदाय संघटक (कर्तव्य व जबाबदारी) :–

- समुदाय संघटक हे शहर प्रकल्प अधिकारी व तांत्रिक तज्ञ (व्यवस्थापक) यांचे नियंत्रणाखाली अभियानाचे काम पाहतील.
- दैनंदिन कामाकाजाचा साप्ताहिक अहवाल तांत्रिक तज्ञ (व्यवस्थापक) यांचेमार्फत शहर प्रकल्प अधिकारी यांना सादर करतील.
- आपल्या कार्यक्षेत्रामधील नागरी दारिद्रय रेषेखालील नागरीक सामाजिक अभिसरणामध्ये समाविष्ट होत आहेत याची खात्री करणे.
- स्वयं सहाय्यता गट, वस्ती स्तर संघ, शहर वस्ती स्तर संघ स्थापित करणे.
- आपल्या कार्यक्षेत्रामध्ये अभियानाअंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.
- अपंगांच्या स्वयं सहाय्य गटांचे तसेच इतर स्वयं सहाय्य गटांचे बळकटीकरण करणे.
- स्वयं सहाय्य गट यांना बॅकांषी संलग्न करणे.
- शासकीय संस्थाषी समन्वय साधणे.
- अभियाना अंतर्गत विविध सर्वेक्षणांना सहाय्य करणे.
- अभियानाअंतर्गत सामाजिक संपर्क, सामाजिक मालमत्तांची देखभाल दुरूस्ती यासारख्या विकास कामांकरीता सहाय्य करणे.
- अभियाना अंतर्गत अभिलेखे लिहीणे.
- सामाजिक स्तरावरील बैठकांचे आयोजन करणे तसेच सदर बैठकांना उपस्थित राहणे.
- कालबध्द अहवाल सादर करणे.
- तसेच शहर प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत देण्यात येणाऱ्या नविन उद्दीष्टे तसेच कर्तव्यांचे पालन करणे.
- समुदाय संघटकांचे कार्यक्षेत्र हे महानगरपालिकेच्या क्षेत्रापुरते मर्यादित असेल. तथापी लोकहित अथवा प्रषासकीय गरज, इ कारणामुळे संबंधीत महानगरपालिकेत करणे अनुज्ञेय असेल.
- नियुक्ती दिल्यानंतर मा. आयूक्त यांच्या आदेषानुसार महानगरपालिके अंतर्गत झोन क्र. 1 ते 10 येथे पदभार स्वीकारून कामकाज करावे लागेल.

- राज्य अभियान संचालक/षहर प्रकल्प अधिकारी/ तांत्रिक तज्ञ (व्यवस्थापक) यांनी दिलेल्या आदेषाचे पालन करणे.
- नियुक्ती पासून अकरा महिने तथापि, संबंधित महानगरपालिकेच्या समुदाय संघटकांच्या प्रथम वर्षातील शेवटच्या महिन्यात साप्ताहिक अहवालाच्या आधारे कामाचा आढावा घेवून काम असमाधानकारक असल्यास, सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. कर्तव्या दरम्यान गैरषिस्त वर्तणूक आढळून आल्यास किंवा कामामध्ये सूचना देवूनही सुधारणा झाल्याचे दिसून आले नाही तर मा. आयूक्त यांना पदावरून कमी करण्याचे अधिकार असतील. काम असमाधानकारक असल्यास सदर पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तीस पुढे काम सुरू ठेवण्याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.
- समुदाय संघटकांस हमी पत्रातून मुक्त व्हावयाचे असल्यास 30 दिवसाची पूर्वसूचना नियुक्ती प्राधिकाऱ्यास देणे आवष्यक राहील.
- तसेच इतर अटी व शर्ती केन्द्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानाच्या मार्गदर्षक सुचना तसेच शासन निर्णय नगर विकास विभागाच्या दिनांक 28 ऑगस्ट 2014 व दिनांक 31 ऑक्टोबर 2017 मध्ये नमुद केल्याप्रमाणे असतील.

## 5. अटी व शर्ती :–

5.1 समुदाय संघटक यांना शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना देय असलेल्या कोणत्याही सेवा शर्ती/सोयी सुविधा उपलब्ध राहणार नाही. सदर नियुक्ती कंत्राटी तत्वावरील असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत सदरहू कंत्राटी तत्वावर नियुक्त व्यक्ती शासकीय सेवेमध्ये समावेष होण्याबाबत मागणी करू शकणार नाही. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अन्य कोणतेही लाभ सेवेत समावेषन, वेतनश्रेणी, रजा पेन्षन इत्यादी अनुज्ञेय नसतील.

5.2 शासन स्तरावरून वेळोवेळी काढण्यात आलेले/येत असलेले शासनाचे तसेच मा. नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आदेष या पदाला बंधनकारक राहतील.

## 6. इतर अटी :–

6.1 नियुक्ती पुर्वी मुळ शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे शाळा सोडल्याचा दाखला अनुभवाचा दाखला, तसेच आवष्यक ती सर्व कागदपत्रे/सांक्षाकित प्रमाणपत्राची छाननी नियुक्ती प्राधिकारी यांचे स्तरावर केली जाईल. मुळ कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतरच अंतिम निवडीची कार्यवाही करण्यात येईल.

6.2 शैक्षणिक अर्हता, व इतर आवष्यक प्रमाणपत्रे ही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या आतील आवष्यक राहतील. प्रमाणपत्र काढण्याकरीता सादर केले असल्याबाबतच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाही व अंतिम निवडीच्या वेळेस अपात्र ठरविण्यात येईल याची सर्व उमेदवारानी नोंद घ्यावी. छाननीअंती वरील प्रमाणपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास/माहिती खोटी आढळल्यास कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल.

6.3 लेखी परीक्षा/मुलाखत याकरीता कोणत्याही प्रकारचा खर्च अनुज्ञेय असणार नाही. स्वताच्या जबाबदारीवर व खर्चाने परिक्षा/मुलाखतीस यावे लागेल.

6.4 परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या यात बदल करणे, परीक्षा स्थगित करणे/अंषतः बदल करणे इत्यादीबाबतचे सर्व अधिकार अथवा संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. आयूक्त यांना असून याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

6.5 निवड प्रक्रीय सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/सादर केलेले दस्तऐवज खोटे असल्याचे निदर्षनास आल्यास त्या उमेदवाराची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यांचे विरूध्द नियमानुसार फौजदारी कारवाई केली जाईल. केवळ अर्ज केले म्हणजे (नियुक्तीचे अंतिम आदेष देईपर्यंत) कुणालाही नियुक्ती आदेष मिळण्याचा हक्क प्राप्त होणार नाही.

6.6 अपात्र उमेदवाराबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

6.7 विहीत पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवाराचे अर्ज, विहीत नमुन्यात नसलेले अर्ज, मजकुर अपुर्ण व चुकीचे भरलेले अर्ज, स्वाक्षरी नसलेले अर्ज फोटो नसलेले अर्ज, विहीत कालावधीत प्राप्त न झालेले अर्ज इत्यादी त्रुटी असलेले अर्ज नाकारण्यात येतील व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

6.8 सदर भरतीप्रक्रियेसंबंधीत सर्व सूचना व माहिती वेळोवेळी केवळ महानगरपालिका संकेतस्थळावर www.nmcnagpur.gov.in प्रसिध्द करण्यात येईल त्यामुळे सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळावरील अद्यावत माहिती व सुचनांचे सातत्याने अवलोकन करणे अनिवार्य राहील.

दिनांक :–

**स्वा.**
**आयूक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (समाज कल्याण विभाग)

अर्ज क्रमांक

**दीनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत**
**कंत्राटी तत्वावरील पदभरती 2018–19**
**अर्जाचा विहित नमूना**

फोटो

**प्रति,**

**मा. आयूक्त,**
**दि.अं.यो.–रा.ना.उ.अ.,**
**महानगरपालिका नागपूर.**

**विषय** : दीनदयाल अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत समुदाय संघटक पदाकरीता अर्ज.

**संदर्भ** : दैनिक वृत्तपत्र ................................ यामधील जाहीरात दिनांक ....................

1. **अर्जदाराचे संपुर्ण नांव :–** ......................................................................
 (आडनांव) (स्वतःचे नांव) (वडीलाचे/पतीचे नांव)
2. लिंग : पुरूष/स्त्री
3. जन्मतारीख :– .......................................
4. दिनांक......................... रोजीचे वय :– वर्ष ................ महिने ............ दिवस .............
5. जात :– ................................ प्रवर्ग :– ....................................
6. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................
 ..................................................................................................................................
 ............... तालुका ........................................... जिल्हा ..................................
7. संपर्क क्रमांक 1) दुरध्वनी क्रमांक ..............................................
 2) भ्रमणध्वनी क्रमांक ..............................................
 3) इमेल पत्ता .............................................................
8. शैक्षणिक पात्रता :–

| अ. क्र. | शैक्षणिक अर्हता | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एस.एस.सी | | | | | | |
| 2 | एच.एस.सी. | | | | | | |
| 3 | पदवी | | | | | | |
| 4 | पदव्युत्तर पदवी (समाजषास्त्र) | | | | | | |
| 5 | एम.एस.डब्लू. | | | | | | |
| 6 | इतर शैक्षणिक अर्हता | | | | | | |

9. संगणक अर्हता :

| अ. क्र. | संगणक अर्हता | बोर्ड / विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |

10. कामाचा अनुभव :

| अ. क्र. | अनुभवाबाबत तपषिल | अनुभवाचा एकूण कालावधी (पासून–पर्यंत) | अनुभवाचे प्रमाणपत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | | | होय / नाही | |
| 2 | | | होय / नाही | |
| | | | होय / नाही | |

11. अर्जदार दारिद्रय रेषेखालील कुंटुबातील आहे काय? :– होय / नाही
(असल्यास प्रमाणपत्र जोडावे)

12. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी आहे काय? :– होय / नाही
(असल्यास प्रमाणपत्र जोडावे)

13. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत कामाचा अनुभव आहे काय? :– होय / नाही
(असल्यास प्रमाणपत्र जोडावे)

ठिकाण :– ........................
दिनांक :– ...........................

.......................................................
अर्जदाराची स्वाक्षरी व संपुर्ण नाव

अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी :–

1. ..........................................................................
2. ..........................................................................
3. ..........................................................................
4. ..........................................................................
5. ..........................................................................
6. ..........................................................................

---

**अर्ज क्रमांक** [ ]

## पोचपावती

1. **अर्जदाराचे संपुर्ण नांव :–** ...................................................................
2. पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता : ..........................................................................................
..................................................तालुका ........................................ जिल्हा ....................................
3. संपर्क क्रमांक 1) दुरध्वनी क्रमांक ................................................
2) भ्रमणध्वनी क्रमांक ............................................

.......................................................
अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व नांव / हुद्दा